# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

(विस्तृत जाहिरात संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी)

विद्यापीठाच्या विविध विभागांकरिता खालील पदे विद्यापीठ निधीतून हंगामी स्वरुपात करार पध्दतीने सरळ सेवेने ठराविक कालावधीसाठी भरण्यासाठी पात्र उमेदवारांनी बुधवार, दिनांक २३/०३/२०१६ ते मंगळवार, दिनांक १२/०४/२०१६ या कालावधीत विहित नमुन्यातील ऑन लाईन (Online) अर्ज भरावयाचा आहे. विहित नमुन्यातील भरावयाचा ऑनलाईन (Online) अर्ज विद्यापीठाच्या **http://admin.unipune.ac.in/recruitment** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| **अ.क्र.** | **पदनाम, वेतन व पदाचा कालावधी** | **पद संख्या** | **पदाचा गट** | **आरक्षण** | **शैक्षणिक अर्हता व अनुभव** |
|---|---|---|---|---|---|
| १. | डेटा बेस ॲडमिनिस्ट्रेटर (Data Base Administrator)<br><br>दरमहा एकत्रित वेतन : रू.६०,०००/-<br><br>कालावधी : ५ वर्षे | ०१ | अ | खुला - १ | **A) Educational Qualifications :**<br>a) Bachelor of Engineering / B.Tech<br>**OR**<br>b) Master of Computer Science / M.Sc (Comp. Science)<br>**OR**<br>c) Master of Computer Application<br>**OR**<br>d) MBA / PGDBM / PGDBA in Computer / IT<br><br>**B) Technical Qualifications :**<br>**Certification :**MCITP SQL DBAon SQL Server 2005 OR Higher Configuration and support of SQL Server 2008 & 2012.<br>Expertise in SQL server internals and architecture.<br><br>**C) Experience :**<br>Minimum 5 years of experience in Database Administration and Monitoring, Maintenance, Optimization,Performance Tuning and Techniques with expertise in SQL 2005, 2008, 2012. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | टेक्निकल लिडर<br>(Technical Leader)<br><br>दरमहा एकत्रित वेतन : रु.५५,०००/-<br><br>कालावधी : ५ वर्षे | ०२ | अ | खुला - १<br>अनु.जमाती - १ | **A) Educational Qualifications :**<br>a) Bachelor of Engineering / B.Tech<br>**OR**<br>b) Master of Computer Science / M.Sc (Comp. Science)<br>**OR**<br>c) Master of Computer Application<br>**OR**<br>d) MBA / PGDBM / PGDBA in Computer / IT<br><br>**B) Technical Qualifications :**<br>a) Microsoft development tools including visual Studio 2008/2010 and TFS.<br>b) Strong programming experience with Net framework, ASP.NET, CSHARP,<br>LINQ, WPF,WCF,MVC,XML&<br>SAML 1.1/2.0.<br>c) At least 2 to 3+ years of hands on experience in html 5, CSS3 &J QUERY.<br>Certification in Microsoft Visual studio is a plus.<br><br>**C) Experience :**<br>Minimum 6 years of experience in a Corporate / Government IT Industry out of which 3 to 5 years as a Leader. |
| ३. | ई-कन्टेन्ट ॲडमिनिस्ट्रेटर<br>(e-Content Administrator)<br><br>दरमहा एकत्रित वेतन : रु.४०,०००/-<br><br>कालावधी : ५ वर्षे | ०१ | अ | खुला - १ | **A) Educational Qualifications :**<br>A. M.Sc in Computer / IT / Physics / Math's / Electronic Science / Instrumentation.<br>**OR**<br>B. BE / B.Tech any stream.<br><br>**B) Technical Qualifications :**<br>a) Windows and Linux system administration.<br>b) Adobe connect server administration.<br>c) Moodle system administration.<br>d) Ezproxy administration.<br><br>**C) Experience :**<br>a) Minimum 4 years experience in Windows and Linux system administration.<br>b) Hands on experience in single sign on technology for E-content like Ex proxy.<br>c) Minimum 1 year experience in Moodle system administration and development, Adobe connect server administration.<br>d) Minimum 2 years experience in Educational or E-Governance System is Desirable. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४. | संपादक<br><br>दरमहा एकत्रित वेतन : रू.३५,०००/-<br><br>कालावधी : ५ वर्षे | ०१ | अ | खुला - १ | A. Master in Communication & Journalism.<br>B. Candidate with Bilingual Skills are prefered.<br>C. Minimum 10 years experience in Print / Electronic Media. |
| ५. | उपसंपादक<br><br>दरमहा एकत्रित वेतन : रू.२५,०००/-<br><br>कालावधी : ५ वर्षे | ०१ | ब | खुला - १ | A. Master in Communication & Journalism / Diploma in Journalism with any P.G.Degree is Mandatory.<br>B. Bilingual (Marathi & English) Skills are prefered.<br>C. Minimum 05 years experience in Print / Electronic Media. |
| ६. | सहायक वसतिगृहप्रमुख (मुले/मुली)<br><br>वेतन बँड रू.९३००-३४८००<br>ग्रेड वेतन रू.४४००/-<br><br>कालावधी : ५ वर्षे | ०२ | क | खुला - १<br>अनु.जाती - १ | १. कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी परीक्षा उत्तीर्ण.<br>२. वरिष्ठ अथवा कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावरील शिक्षक म्हणून अध्यापनाचा किमान तीन वर्षांचा अनुभव असणे आवश्यक.<br>**अथवा**<br>कार्यालयीन कामकाजातील प्रशासकीय कामाचा कमीत कमी तीन वर्षांचा अनुभव आवश्यक.<br>३. वसतिगृहामध्ये वसतिगृहप्रमुख म्हणून अथवा समकक्ष पदाचा वसतिगृह देखरेखीचा अनुभव असल्यास प्राधान्य. |

## - सर्वसाधारण सूचना -

- **ऑनलाईन अर्ज करण्याच्या महत्वाच्या तारखा :**

    १. ऑनलाईन पध्दतीने अर्ज करण्याचा कालावधी : बुधवार, दिनांक २३/०३/२०१६ ते मंगळवार, दिनांक १२/०४/२०१६ पर्यंत.

    २. ऑनलाईन पध्दतीने अर्ज केल्यानंतर त्याची प्रिंटआऊट घेऊन स्वाक्षरीसह एक प्रत आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती नजीकच्या काळातील पासपोर्ट आकाराचे स्वतःचे छायाचित्र चिकटवून शुक्रवार, दिनांक २२/०४/२०१६ पर्यंत कार्यालयीन वेळेत उपकुलसचिव, प्रशासन शिक्षकेतर कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, गणेशखिंड, पुणे - ४११ ००७ येथे जमा करण्यात यावे.

    ३. अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकानंतर (कार्यालयीन वेळेनंतर) प्राप्त होणा-या अर्जांचा विचार केला जाणार नाही.

- **ऑनलाईन अर्ज करण्याची पध्दत :**

१. उमेदवाराने विद्यापीठ संकेतस्थळावरील विस्तृत जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

२. उमेदवाराने अर्ज (Hard Copy) विद्यापीठात सादर करतांना शैक्षणिक, अनुभव आणि अन्य प्रमाणपत्रे व अर्ज शुल्काच्या चलनाची प्रत जोडणे आवश्यक आहे.

३. ऑनलाईन अर्जामध्ये संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रुटी राहिल्यास व अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

४. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरतांना सर्वप्रथम संकेतस्थळावर जाऊन स्वतःची नोंदणी (Create Account) करावयाचे आहे.

५. संकेतस्थळावर स्वतःची नोंदणी करतांना उमेदवाराने त्याची वैयक्तिक माहिती अचूकरित्या भरुन युजर नेम व पासवर्ड तयार करावा.

६. Login मध्ये युजर नेम व पासवर्ड टाकल्यावर अर्जदाराने वैयक्तिक, प्रवर्ग (आरक्षण), शैक्षणिक आणि अनुभवासंदर्भातील माहिती अचूकरित्या दिलेल्या क्रमाने भरावी.

७. "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या शीर्षकावर जाण्यापूर्वी अर्जदाराने वैयक्तिक, प्रवर्ग (आरक्षण), शैक्षणिक आणि अनुभवासंदर्भातील माहिती बरोबर असल्याची खात्री करावी. त्यानंतर उमेदवारास वरील माहितीमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

८. अर्जाचे शुल्क खुल्या गटातील उमेदवारांसाठी रु.४००/- व मागासवर्गीय उमेदवारांसाठी रु.२००/- इतके आहे. "अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा" या लिंकवर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने त्यास ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदासंदर्भातील माहिती भरल्यानंतर अर्जाच्या शुल्काचे तीन प्रतीत तयार झालेले चलन बँक ऑफ महाराष्ट्र (Bank of Maharashtra) अथवा एच.डी.एफ.सी. (HDFC Bank) च्या कोणत्याही शाखेत रोख भरण्यात यावे. तसेच अर्जाचे शुल्क डेबीट / क्रेडिट कार्डद्वारे ऑनलाईन पध्दतीने सुध्दा भरता येतील. तद्नंतरच अर्ज भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया पूर्ण होईल. त्यानंतर अर्जाची प्रिंटआऊट काढावी.

९. ऑनलाईन अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकानंतर जाहिरातीमध्ये नमूद करण्यात आलेल्या पदाकरिता अर्ज (Apply) करता येणार नाही.

१०. वरील पदांसाठी फक्त विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन विहित ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे केलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

- **वयोमर्यादा:**

१) अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास वयोमर्यादा गणली जाईल.

२) डेटाबेस ॲडमिनिस्ट्रेटर, टेक्निकल लिडर आणि ई-कन्टेन्ट ॲडमिनिस्ट्रेटर या पदांसाठी उमेदवाराचे वय अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास किमान २५ वर्षे पूर्ण व कमाल ३५ वर्षे अशी राहिल. मागासवर्गीय उमेदवारांसाठी पाच वर्षे शिथिलक्षम राहिल.

३) संपादक पदासाठी उमेदवाराचे वय अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास किमान ३० वर्षे पूर्ण व कमाल ४० वर्षे अशी राहिल. मागासवर्गीय उमेदवारांसाठी पाच वर्षे शिथिलक्षम राहिल.

४) उपसंपादक पदासाठी उमेदवाराचे वय अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास किमान २५ वर्षे पूर्ण व कमाल ३५ वर्षे अशी राहिल. मागासवर्गीय उमेदवारांसाठी पाच वर्षे शिथिलक्षम राहिल.

५) सहायक वसतिगृहप्रमुख (मुले/मुली) पदासाठी उमेदवाराचे वय अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास किमान १८ वर्षे पूर्ण व कमाल ३३ वर्षे अशी राहिल. मागासवर्गीय उमेदवारांसाठी पाच वर्षे शिथिलक्षम राहिल.

- **मागासवर्गीयांचे आरक्षण :**

१. जातीच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ महाराष्ट्र अनु.जाती, अनु.जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग, विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्यांच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम - २००० मधील तरतुदींनुसार सक्षम प्राधिका-याकडून प्रदान करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.

२. वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र आणि इमाव या प्रवर्गाचा दावा करणा-या उमेदवारांनी समाजातील उन्नत व प्रगत गटामध्ये मोडत नसल्यास तसे अर्जामध्ये स्पष्टपणे नमूद करणे व त्याबाबतच्या नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत कागदपत्रांच्या छाननीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील अन्यथा अशा उमेदवारांचा मागासवर्गाचा दावा ग्राह्य धरला जाणार नाही. (आर्थिक वर्ष २०१४-१५ चे दिनांक १ एप्रिल, २०१५ नंतर सक्षम अधिका-याने निर्गमित केलेले नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल.)

३. उन्नत व प्रगत गटामध्ये मोडणा-या वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), विमाप्र आणि इमाव या प्रवर्गातील उमेदवारांना वयोमर्यादा, आरक्षण या सवलतींसह कोणत्याही सवलतीस पात्र समजले जाणार नाही.

४. सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२ डिसेंबर, २०११ नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जातवैधता प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत सादर करण्याच्या अटीवर व मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या अधीन राहून नियुक्ती दिली जाईल. नियुक्ती दिल्यावर जात पडताळणीसाठीचा प्रस्ताव हा पडताळणी समितीकडे सादर केल्याची पोहोच कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

५. सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम मधील तरतुदीनुसार विमुक्ती जाती (अ), भटक्या जमाती (ब),(क),(ड) प्रवर्गासाठी विहित केलेले आरक्षण अंतर्गत परिवर्तनिय असेल.

- **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापनः**

१) शासनाने शासकीय विभागातील गट - अ, ब, क आणि ड मधील पदांच्या सेवाप्रवेशासाठी एक आवश्यक अर्हता म्हणून महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५, दिनांक २८ मार्च, २००५ च्या अधिसूचनेद्वारे लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन विहित केले आहे. या नियमांतील तरतुदींनुसार शासकीय सेवेतील पदासाठी अर्ज करतांना अर्जासोबत उमेदवाराने विहित नमुन्यातील प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे.

२) प्रतिज्ञापनात नमूद केल्यानुसार हयात असलेल्या अपत्यांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या अपत्यामुळे उमेदवार विद्यापीठ सेवेतील नियुक्तीसाठी अनर्ह ठरविण्यात येईल.

- **इतर सूचना :**

१) अर्ज भरण्याच्या अंतिम दिनांकास असलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव व वय ग्राहय धरण्यात येईल.

२) अनुभवाच्या बाबतीत मासिक, नियतकालिक, अशंकालिक, विद्यावेतन, अंशदानात्मक विनावेतन तत्वावर केलेला अंशकालिक सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरिक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राहय धरला जाणार नाही.

३) पात्र उमेदवाराची निवड झाल्यास विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील कार्यालयांमधील आस्थापनांमध्ये नियुक्ती अथवा बदली करण्यात येईल.

४) अर्जदारांनी नावातील बदलाबाबत शासन राजपत्राची साक्षांकित प्रत, विशेषतः महिला उमेदवारांनी नावातील बदलाबाबत विवाह नोंदणी प्रमाणपत्र अथवा शासन राजपत्राची साक्षांकित प्रत कागदपत्रांच्या छाननीच्या वेळेस सादर करणे बंधनकारक राहील.

५) या भरती प्रकियेसंदर्भात या कार्यालयाकडून वेळोवेळी प्रसिध्द होणारी माहिती व सूचना विद्यापीठाच्या **http://admin.unipune.ac.in/recruitment** या संकेतस्थळावर प्रसिध्द होणार असल्याने भरतीप्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांनी वरील संकेतस्थळावरील माहिती वेळोवेळी पाहावी. यासंबंधी विद्यापीठ कार्यालयात दूरध्वनीद्वारे / प्रत्यक्ष संपर्क साधू नये.

६) अर्जदाराने अर्ज करतेवेळी शिक्षण, वय, पदासाठी असलेले आरक्षण याबाबी विचारात घेऊन प्रत्येक पदासाठी स्वतंत्र अर्ज ऑन लाईन (Online) भरावा.

७) ज्या राखीव प्रवर्गासाठी पद आरक्षित आहे, त्याच राखीव प्रवर्गातील उमेदवारांनी त्या पदासाठी अर्ज करावेत. (जातीच्या प्रमाणपत्राची प्रत आणि जातवैधता प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.) महाराष्ट्र राज्याबाहेरील रहिवासी असलेल्या मागासवर्गीय उमेदवारांनी अर्ज केल्यास ते खुल्या प्रवर्गात गणले जातील.

८) सध्या सेवेत असणा-या उमेदवारांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने भरावे व नियोक्त्याचे मूळ ना-हरकत प्रमाणपत्र व वेतनचिठ्ठी / वेतन प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

९) ऑनलाईन अर्ज केला/स्विकारला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, खोटी माहिती पुरविल्यास, एखादया अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी विद्यापीठ निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्ष दबाव आणला अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर बाद करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता अशा उमेदवाराची नियुक्ती समाप्त करण्यात येईल व त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१०) मुलाखत/नेमणूक यापैकी कोणत्याही टप्यावर टपालखात्याकडून उमेदवारास वेळेवर पत्र न मिळाल्यास अथवा विद्यापीठ संकेतस्थळावरील भरती प्रक्रियेसंदर्भात प्रसिध्द केलेल्या सूचना व माहितीची उमेदवाराने नोंद न घेतल्यास त्यास विद्यापीठ जबाबदार राहणार नाही. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही अथवा म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

११) जाहिरातीतील पदांच्या संख्येमध्ये कमी / जास्त बदल होण्याची शक्यता आहे. पदाची संख्या, आरक्षण याबाबत बदल करणे, अंशत बदल करणे याबाबतचे सर्व अधिकार विद्यापीठ प्रशासन हे स्वतःकडे ठेवत आहेत. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही. तसेच भरती प्रक्रियेसंदर्भात वाद, तक्रारीबाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार नियुक्ती प्राधिकारी यांना राहील व त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

१२) अर्ज स्विकारणे किंवा नाकारणे याबाबत विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

१३) जाहिरातीमधील नमूद पदे भरणे किंवा न भरणे याचा हक्क विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

जाहिरात क्रमांक : २०
दिनांक : २२/०३/२०१६

**(डॉ. नरेंद्र मा. कडू)**
कुलसचिव